दिव्य सिटी

सिटी ॲक्टिव्हिटी

नाशिक, १० ऑगस्ट २०१४
रविवार

सुविधाजनक | कुंभमेळा परिषदेप्रसंगी खासदार हेमंत गोडसे यांनी दिले आश्वासन

# स्मार्ट तंत्रज्ञानासह स्वतंत्र प्राधिकरणासाठी प्रयत्नशील

## किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

प्रतिनिधी | नाशिक

कुंभमेळ्यातील गर्दीवर नियंत्रण मिळवता यावे, यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ, टेलिव्हिजन, रेडिओ कुंभ स्टेशन यांसह आधुनिक स्मार्ट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा. तसेच, कुंभमेळ्यासाठी कायमस्वरूपी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असे आश्वासन खासदार हेमंत गोडसे यांनी येथे दिले.



किर्लोस्कर आणि वसुंधरा क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कुसुमाग्रज स्मारकात किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी स्मारकात कुंभमेळा परिषद पार पडली. परिषदेत जल संघटन बिरादरीचे सुनील जोशी, अभिजित घोरपडे, उद्योजक धनंजय बेळे, अविनाश शिरोडे, गोदावरी गटारीकरणविरोधी मंचाचे राजेश पंडित यांसह पर्यावरणप्रेमी उपस्थित होते. दर बारा वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्यासाठी कायमस्वरूपी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न करण्यात येईल. तसेच, स्वतंत्र प्राधिकरण तयार करून त्या माध्यमातून कुंभमेळ्याचे नियोजन करणे गरजेचे असल्याने त्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, अशी माहिती खासदार गोडसे यांनी दिली. या वेळी अभिजित घोरपडे यांनी गोदावरी प्रदूषणमुक्तीला प्रथम प्राधान्य देऊन त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन केले, तर सुनील जोशी यांनी कुंभमेळ्यातील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्मार्ट तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची गरज असल्याचे सांगितले. या परिषदेत विविध क्षेत्रातील सहभागी मान्यवरांनी विविध सूचना मांडल्या.

## 'ग्रीन बिल्डिंग' संकल्पनेसाठी प्रयत्न होणे गरजेचे



बांधकाम व्यावसायिकांनी ग्रीन बिल्डिंग उभारण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे. क्रेडाई संस्थेने त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. शहरांची लोकसंख्या वाढत असल्यामुळे झपाट्याने विकास होत आहे. पर्यावरण संवर्धनासाठी ग्रीन बांधकाम ही संकल्पना प्रत्यक्षात आणली पाहिजे. भविष्यातील गरज लक्षात घेऊनच यापुढे बांधकामे व्हायला हवीत, असे मत पुणे येथील ॲड. सायली जोशी यांनी व्यक्त केले. स्मार्ट सिटी विकसित करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा, असे मतही त्यांनी या वेळी व्यक्त केले.

## 'नेचर वॉक'मधून निसर्ग सौंदर्याची पाहणी

वसुंधरा महोत्सवात शनिवारी सकाळी किरण रहाळकर यांच्यासह १५ ते २० पर्यावरणप्रेमींनी रामशेज किल्ल्यावर जाऊन निसर्गाची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. निसर्गातील जैवविविधतेचे महत्त्व जाणून घेत त्याचे संवर्धन व संरक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे. रामशेज किल्ल्यावरील ६० रानफुलांचा आणि प्राण्यांचा अधिवास असल्याने या सर्वांची ओळख या 'नेचर वॉक'मधून करून घेण्यात आली.